दूरध्वनी : 25331211
25331590

# ठाणे महानगरपालिका, ठाणे

महापालिका भवन, सरसेनानी जनरल अरूणकुमार वैद्य मार्ग,
चंदनवाडी, पांचपाखाडी, ठाणे- 400 602.
THE MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE

संदर्भ क्र./ठा.म.पा/स्था.मा.वि/कार्या.अधि. - 5763 दिनांक:- 22/11/2018

## ठाणे महानगरपालिका, ठाणे

स्थावर मालमत्ता विभाग,

जाहिर सुचना

याव्दारे जाहिर आव्हान करण्यात येते की, अर्जदार श्री.तानाजी परशुराम भागीवंत यांचा दि. 05/09/2018 रोजीचा अर्ज प्राप्त आहे.

अर्जात त्यांनी माझे आई ,वडील परशुराम ज्ञानदेव भागीवंत हे वारले नंतर आमच्या वडीलांच्या नावे असलेला मे. सत्यम फुटवेअर गाळा क्र.15 हा वारसाने माझे लहान भाऊ श्री. गणेश परशुराम भागीवंत यांनी दि. 13/07/2018 रोजी नावे करून घेतला आहे. श्री. गणेश परशुराम भागीवंत गाळा क्र.11बाबत गावदेवी भाजी मार्केट ठाणे या गाळयांसदर्भात सर्व मूळ पुरावे सन 1984 ते 1989 व 2006 माझे नावे आहेत. तरी हे पुरावे व वारस वहिवाट ग्राह्य धरुन गाळा क्र.11 ला श्री. तानाजी परशुराम भागीवंत व श्री. गणेश परशुराम भागीवंत अशी नावे लावण्यात यावी असे नमूद केले आहे.

अर्जासोबतची कागदपत्रे तपासली असता व मूळ नस्तीचे अवलोकन केले असता गावदेवी भाजी मार्केटमधील गाळा क्र.11 जो सद्यस्थितीत श्री. गणेश परशुराम भागीवंत यांचे नावे आहे. सदरील गाळा क्र.11 ला श्री. तानाजी परशुराम भागीवंत व श्री. गणेश परशुराम भागीवंत अशी वारसदारांची नावे लावणेबाबत श्री. शिवाजी परशुराम भागीवंत व इतर कोणाच्या हरकती/आक्षेप किंवा कोणाचे हक्क प्रस्थापित होत असल्यास आवश्यक त्या पुराव्यांसह सदर सूचना प्रसिद्ध झाल्यापासुन 07 दिवसाच्या आत उप आयुक्त, स्थावर मालमत्ता विभाग, ठाणे महानगरपालिका,ठाणे येथे आपल्या हरकती लेखी स्वरुपात द्याव्यात. अन्यथा उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे पुढील निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर सूचना ठाणे महानगरपालिकेच्या www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

(महेश आहेर)
कार्यालयीन अधिक्षक,
स्थावर मालमत्ता विभाग,
ठाणे महानगरपालिका,ठाणे